Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed & Refereed Indexed

Multidisciplinary International Research Journal

April -2021

ISSUE No- 291 (CCXCI ) A

## Women's Empowerment Issues and Challenges



**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor**
Asst. Prof. Baliram Pawar
Head, Department of Sociology
Mahatma Phule Mahavidyalaya Kingaon
Latur Maharashtra

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) -7.675, Issue NO, 291 (CCXCI) A
ISSN : 2278-9308
April, 2021


| | | |
|---|---|---|
| 19 | Role Of Indian Women In Environment Protection **Dr.Suresh Lamba** | 104 |
| 20 | Women's Education In Women Empowerment And Development India **Dr. Suvarna S. Madar** | 111 |
| 21 | Status Of Women In Indian Society **Dr.Udreshwar Virupaxayya** | 117 |
| 22 | Women's Movement In India **Dashavant Maruti** | 122 |
| 23 | A Research Paper On Industry And Women **Dr.Chandrakant Gundappa Gaikwad** | 126 |
| 24 | Women's Empowerment **Dr.vithalrao Shankarrao Rajole** | 130 |
| 25 | English Literature And Women Empowerment **Dr. Kamya wadhwa** | 134 |
| 26 | Women Empowerment Initiatives In India **Smt. Ashwini a. Kotnis \ Shri. Ankush M. Gondage** | 137 |
| 27 | Fighting Violence Against Women With Special Reference To Anti-Rape Laws: An Analysis **Dr. Nabamita Paulray** | 143 |
| 28 | Role of Media in Women Empowerment **Dr. Manjusha Y. Dhoble** | 147 |
| 29 | Role Of Ict For Promoting Women Empowerment **Dr. Anuj Datt Sharma** | 150 |
| 30 | Dangal, an Inspirational Saga of Women Wrestling **Dr. Surender Singh** | 156 |
| 31 | Empowering women through "Kanyashree Scheme" in West Bengal **Dona Datta** | 160 |
| 32 | महिला सशक्तीकरण आणि भारतातील स्त्रियांना भेडसावणाऱ्या समस्या प्रा. डॉ. आनंद ज्ञानेश्वर शिंदे | 164 |
| 33 | महिला सक्षमीकरणाच्या वाटा आणि आपली जबाबदारी प्रा. डॉ. सतीश गंगाराम ससाणे | 169 |
| 34 | आधुनिक काळातील महिला व विकास(भारतीय महिलांची विविध काळातील दर्जात्मक स्थिती डॉ. गणेश ए. पोटे | 171 |
| 35 | महिला उद्योजकांचे विश्लेषणात्मक अध्ययन डॉ. प्रमिला हरीदास भुजाडे | 175 |
| 36 | शैक्षणिक ग्रंथालयातील अध्ययन आणि संशोधनास उपयुक्त प्रेरक उपक्रम श्री.विठठल विश्वनाथ जाधव/डॉ.विक्रम व्ही. गिरी | 182 |
| 37 | महिला सक्षमीकरण—एक दृष्टीकोन डॉ.जाधव राजेश्री अप्पाराव | 188 |
| 38 | महिलांच्या सामाजिक समस्या प्रा.डॉ.सौ.रायठक दिपमाला विश्वनाथ | 191 |

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 291 (CCXCI) A
ISSN : 2278-9308
April, 2021

# महिलांच्या सामाजिक समस्या
# Women's Social Problem

प्रा.डॉ.सौ.रायठक दिपमाला विश्वनाथ
समाजशास्त्र विभाग प्रमुख
श्री संत जनाबाई शिक्षण संस्थेचे,कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
ता.गंगाखेड जि.परभणी मो.९४२०६६४१००

प्रस्तावना:—

भारतीय संस्कृतीमध्ये स्त्रीला देवीचा दर्जा देउन तिचा गौरव केला जातो तर दुसरीकडे वास्तव जीवनात तिला दुय्यम स्थाने दिले जाते. अशा या चक्रव्युहात प्राचीन काळापासुन भारतीय स्त्री होती. स्वत्व, स्वाभिमान, आत्मसन्मान या शब्दांचा तिच्याशी काडीमात्र संबंध नव्हाता. ज्ञानाचा प्रकाशच तिच्यापासुन हिरावुन घेण्यात आला होता. धार्मिक नितीनियमांनी स्त्रीचे जीवन चाकोरीबध्द, पुरुषकेंद्रीत करुन तिच्या मानसिक व बौध्दीक विकासाला खीळ घातली. पुरुषी व्यवस्थेने स्त्रीला, मानसिक गुलामगीरी, करण्यास भाग पाडले. जर एखादी स्त्री पारंपारिक स्त्रीजीवनाची चाकोरी सोडुन प्रागतिक विचार, स्त्रीवादाचे विचार, अंधश्रध्देविरोधी, पुरुषविरोधी आणि धर्माविरोधी विचार व्यक्त करत असेल तर तिला नावे ठेवणाऱ्या, तिची हेटाळणी करणाऱ्या पुरुषांच्याही पुढे स्त्रियाच असाव्यात अशी धुर्त व्यवस्था या पुरुषव्यवस्थेने करुन ठेवलेली आहे.

संपुर्ण जगभरातील महिला 'स्त्री' या नात्याने जवळ येवून महिला चळवळी सरु केल्या. अमेरीकेमध्ये सन १९६० मध्ये 'Women's Studies' ची सुरुवात झाली, पण खऱ्या अर्थाने १९७५ नंतर या अध्ययनाला चालना मिळाली. भारतामध्ये धार्मिक व पारपांरिक संस्कृतिने महिलांचे जीवन अंधकारमय केले होते. त्यामुळे जागतिक पातळीवर काही प्रमाणात महिलांना स्वातंत्र्य असल्याने त्या पातळीवर महिला चळवळी १९ व्या शतकाच्या मध्यनंतर उदयास आल्या, मात्र भारतात १८ व्या शतकात उदयास आल्या होत्या.

भारतीय समाजात स्त्रियांना नेहमीच दुय्यम स्थान देउन तिच्या सामाजिक, शैक्षणिक, रायकीय, सांस्कृतीक जाणिवा नष्ट होण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. त्यामुळे स्वता:त क्षमता असूनही त्याची जाणिव स्त्रियांना कधीच झाली नाही. निणर्य प्रक्रियेतील तिचा सहभाग नाकारुन तिचे विश्व चार भिंतीत बंदिस्त केले. प्राचीन व मध्ययुगीन कालखंडामध्ये काही मोजक्याच स्त्रियांनी राज्यकारभारात महत्वाची भूमिका बजावली मात्र सर्वसामान्य महिलांचा राजकारणाशी संबंध येण्याचा प्रश्नच नव्हता.

**शोध निबंधची उध्दिष्टये:—**

१) विविध काळातील महिलांची भूमिका व दर्जा अभ्यासणे.
२) महिला संघटनांचा अभ्यास करणे.
३) महिला संघटनांचा उद्देशांची फलश्रृतीचा आढावा घेणे.

**(अ) प्राचीन युग:—**

प्राचीन कालखंडात महिलांच्या बाबतीत चार युगे मानली जातात. या प्रत्येक युगात महिलांच्या भूमिका व दर्जात बदल झालेला दिसतो. त्यामुळे चार युगे थोडक्यात अभ्यासली आहेत.

१) महिला सत्ताक (मातृसत्ताक) युग :—

प्राचीन काळापासून भारतीय स्त्री दुय्यम स्थांनी होती असा एक समज रुढ आहे. मात्र वास्तविक पाहता हा कालखंड स्त्रियांना मानाचे स्थान देणारा होता. या कालखंडास स्त्रीसत्ताक किंवा मातृसत्ताक कालखंड म्हणतात. प्राचीन कालखंडात अपत्यानिर्मितीतील पुरुषांचा सहभाग पुरुषाला माहित नव्हता. नवनिर्मितीची क्षमता फक्त पृथ्वी आणि स्त्री यांच्यातच आहे आणि त्याला काहीतरी दैवी आधार असला पाहिजे अशी पुरुषाची भावना होती.

मातृसत्ताक समाजात स्त्री—पुरुष समान होते. पण मानवी समाजात महिलांनी जीवनासाठी महत्वपूर्ण असणारा आणखी एक शोध लावला ते म्हणजे भुमिचा शोध होय. यावरुन असे लक्षात येते की समाजात स्त्रिंचा दर्जा हा उच्च स्वरुपाचा होता.

२) वैदिक युग (इ.स.पूर्व ३००० ते इ.स.पूर्व १५००):—

सामान्यतः इ.स.पूर्व ३००० ते इ.स. पूर्व २५०० या दरमयान आर्यांचे भारतात आगमन झाले असे समजले जाते. भारतीय समाजामध्ये आस्तित्वात असलेल्या मातृसत्ताक अनार्य संस्क्तीचा पराभव करुन आर्यांनी या युगात पुरुषसत्ताक आर्य संस्कृतीचे बीजारोपन केले. भारतात आर्यांनी आपल्या वर्चस्वाखाली व्यवसायानुसार ब्राम्हण, क्षत्रिय व वैश्य हे तीन समुह तयार केले. आर्यांनी मुळभारतीय किंवा अनार्यांना आपले गुलाम बनवून शुद्रांचा चौथा समुह निर्माण केला. हे सर्व व्यवस्थित चालण्यासाठी कायदा म्हणून ऋगवेद, यजुर्वेद, अर्थवेद आणि सामवेद अशा चार वैदाची निर्मिती केली.

वैदिक युगात स्त्रियांना मालमत्तेचा कोणताच हक्क नव्हता. सर्व मालमत्ता कुटूंबाची असून तिच्यावर कुटूंबातील ज्येष्ठ पुरुषाचा आधिकार असे. या काळात महिलांचा दर्जा पुरुषांचा बरोबरीचा होता. या काळात संतती निर्मिती मध्ये महिलांची महत्वाची भूमिका मानली आहे.

३) उत्तर वैदिक युग (इ.स.पूर्व १५०० ते इ.स. पूर्व ५००):—

उत्तर वैदिक युगात आर्यांचे जीवन येथे स्थिर झाले आहे. यामध्ये उपनिषदांचा व स्मृती—पुराणाचा काळ हे प्रकार पडले आहेत. पुरुषसत्ता अधिक दृढ करण्यासाठी महिलांवर अनेक बंधने लाभली गेली. मुळ भारतीय मातृसत्ताक व्यवस्था दडपुण पित्रसत्ताक व्यवस्था निर्माण करण्यासाठी महिलांचा बळी कसा गेला याचे स्पष्टीकरण होण्यासाठी डॉ.गाडगीळ यांचे वाक्य पाहूया. ते म्हणतात. ''पुरुषप्रधान वैदिक आर्य समाजाने अनेक क्रूर चालीरितींच्या मदतीने या जमातीच्या जीवनातील मातृसत्ताकाचे माहात्म्य नष्ट केले, बालविवाह, बहुपत्नीकत्व, विधवांना दिली जाणारी अमाणुष वागणुक आणि 'सतीचीचाल' या सर्व गोष्टी यादृष्टीने उद्बोधक आहेत. महिलांच्या तुलनेत पुरुष कसे श्रृष्ट आहेत. यासाठी चाली रुढ केल्या स्त्री माहात्म्याचे अवमूल्य करण्याचा इतका कठोर आणि आग्रही प्रयत्न जगात अन्यत्र कोठेही झालेला दिसून येत नाही. या युगात महिलांचे जीवन अंधकारमय करणाऱ्या 'मनुस्मृती' सारख्या धर्मग्रंथाची रचना झाली.

४) बौध्द व जैन युगः—

हिंन्द धर्माने सर्वच महिलांना धर्म, राजकारण, समाज व शिक्षण यात दुय्यम दर्जा देवून 'चुल आणि मुल' ऐवढेच स्त्रियाचे कार्यक्षेत्र होते. या हिंन्दु धर्माच्या कर्मठतेला आव्हान देत, ज्ञान आणि विज्ञानाच्या आधारावर बौध्द व जैन धर्माने महिलांना समान मानुन ज्ञानांची दारे खुली केली. याहि पुढे जावून स्त्रीला निर्वान प्राप्तीचा अधिकार दिला.

ब) मध्ययुगीन युगः—

हा काळ भारतीय महिलांच्या जीवनातील अत्यंत अधंकारमय युग म्हणून ओळखला जातो. प्राचीन युगतील वर्ण जाती व्यवस्थेने रुद्ररुप धारण केले होते. यात जातीव्यवस्था अत्पंत जाचक व तितकीच कठोर बनली. भारतीय समाजात चार वर्णांचे वर्णसंस्कार झाल्याने असंख्य जाती तयार

झाल्या. जातीची शुध्दता सांभाळण्याची जबाबदारी महिंलानवर आली म्हणुन महिलांचा बळी ठरला. पावित्र्याच्या संकल्पनेला धर्मशास्त्राची जोड घालून नैतिक व अनैतिक या संकल्पना महिलांच्या मनावर रुजवण्यासाठी व्रत वैकल्यांची महीती पटवुन स्त्रियांना कायम स्वरुपी त्यात गुंतवण्यात आले या युगात महिलांचे जीवन पूर्णत: पुरुषाधीन व परावलंबी होते. परावलंबी व्यक्तीचा दर्जा कनिष्ठ असून गुलामगीरी कडे नेतो.

क) १९ व्या शतकाच्या प्रारंभीचे युग:—

एकोणीसाव्या शतकापर्यंत सामाजिक, आर्थिक, धार्मिक, रायकीय व शैक्षणिक दृष्ट्या स्त्रीयांचा दर्जा प्रचंड रसातळाला गेला होता. पुरुषी वर्चस्व इतके पराकोटीला गेले होते की, इतक्या हालआपेष्टा वाढल्या होत्या त्या सोसत नशीबाला, दैवाला दोष देत मरण यातनांचे जीवन जगण्यापेक्षा दुसरा कोणताच मार्ग महिलांपुढे नव्हाता. एकोणीसवे शतक महिलांसाठी खऱ्या आर्थाने सामाजीक आधुनिकतेची पहाट घेवून उगवले होते. विविध परंपरा व चालीरितीने चार भिंतीच्या आत बंद केलेल्या भारतीय महिलांच्या जीवनात हे शतक अशेचा नवकिरण घेवुन आले.

कुटूंबात महिलांचे कार्य 'चुल आणि मुल' एवढेच होते. आणि स्त्री म्हणजे एक भोगवस्तु हा सामाजीक दृष्टीकोण दृढझाला होता. जातीव्यवस्था ही भारतीय समाजाचे प्रमुख वैशिष्टये आहे. महिलानां जातीव्यवस्थेचे प्रवेशव्दार मानल्या जाते. यातुन जातीची शूध्दता कायम ठेवण्याची जबाबदारी भारतीय धर्माने स्त्रीवर लादली आहे. भारतीय महिलांना विविध प्रथांनी पछाडलेले दिसुन येते. त्यात बालविवाह, हुंडा पध्दत, वैधक्य, केशवपण, जठर विवाह व सतीप्रथा यामुळे स्त्रीचे जीवन प्रचंड दु:खमय बनले होते.

**महिला मुक्तीसाठी विविध संघटनांची भूमिका:—**

भारतीय सामाजिक संस्कृतीमध्ये एका बाजूला महिलानां देवीचा दर्जा देवून तिचा सन्मान केला जातो तर दुसऱ्या बाजूने वास्तवजीवनात तिला पायतनापेक्षाही हिन समजले जाते. अशा स्वरुपाच्या विरोधाभासाच्या चक्रात प्राचीन युगापासून भारतीय महिला घुसमटत होती.

पारपांरिक समाजव्यवथेला ब्रिटिश भारतात आल्याने त्यांच्यातील स्त्रीशिक्षणाच्या जागृतिने हादरे बसले. पाश्चात्य शिक्षणामुळे भारतात एक सुशिक्षीतांची फळी तयार झाली. या फळीतून महिलांना जेव्हा स्त्रीप्रश्नांची जाणीव झाली तेव्हा महिला संघटित होवू लागल्या वत्यातुनच हळूहळू महिला संघटनांच्या उदयाची बीजे फुलू लागली. त्यानंतर स्त्रियांचे हक्क, विविध समस्या यासाठी लढा देण्यास या महिला संघटना सज्ज झाल्या. भगिनीभाव हि संकल्पना जागतीक पातळीवर रुजली. 'मागून मीळत नसेल तर झगडुन प्राप्त करा' या न्यायाने महिला स्वत:च्या हक्कांसाठी संघटनेच्या माध्यमातून उभ्या राहिल्या.

**1) The Women's Indian Assosiation:-**

भारतातील विविध स्त्रि संघटनेमध्ये सुरुवातीची महिला संघटना म्हणजे W.I.A. हि आहे. या संघटनेची स्थापना इ.स.१९१५ साली केली. स्थापनेचे श्रेय मार्गरेट कझिन्सला दिले जाते. स्त्री शिक्षण हा W.I.A. चा प्रमुख उद्देश होता. म्हणजे माहिलांना लिहिता—वाचता येण्यापूरते शिक्षण देण्याबरोबरच महिलांना आर्थिक दृष्टया स्वंयपूर्ण करण्यासाठी हस्तव्यवसायाचे प्रशिक्षण देणे हि संघटना सर्वच जाती, धर्माच्या महिलांसाठी कार्य करणारी संघटना होती.

**2) All India Women's Conterence (AIWC):-**

आखिल भारतीय महिला परिषद:—

संपूर्ण भारतभर महिलांच्या सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतीक, आर्थिक व राजकीय विकासाच्या समस्यासाठी काम करणारी व्यापक व महत्वाची महिला संघटना म्हणून अखिल भारतीय महिला परिषद (A.I.W.C)ओळखली जाते. या संघटनेची स्थापना इ.स.१९२७ मध्ये झाली

आहे. इ.स.१९२७ पर्यंत महिला शिक्षण हेच उधिष्ट समजुन परिषदेने कार्यकेले. परंतु इ.स. १९२९ पासुन परिषदेने आपल्या कार्याची व्याप्ती वाढवून सामाजीक सुधारणांचाही यात समावेश केला.

**A.I.W.Cचे उदिष्टये:—**

१) भारतामधील महिला व बालके यांच्या प्रगती आणि कल्याणासाठी कृतीशील कार्य करणे.
२) महिला व मुलांच्या शिक्षणाला चाना देणे.
३) सामाजिक सुधारणा घडवुन आणन्यासाठी काम करणे.
४) सर्वांना समान हक्क आणि समान संधी असावी यासाठी प्रयत्न करणे.
५) जीवनांच्या सर्वच कार्यात उच्च नैतिक आदर्शासाठी आगृह करणे.

**महिला संघटनेच्या उददेशाची फलश्रृती:—**

स्त्री शिक्षण हा 'Women's Indian Association' चा मुख्य उददेश होता. या उददेशाप्रमाणे महिला शिक्षण हे उच्च वर्गासाठीच असल्याचे दिसून येते, कारण भारत स्वातंत्र्यापर्यंत उच्च वर्गाव्यतिरिक्त इतर कोणत्याही वर्गात महिलांच्या शिक्षणाचे प्रमाण दिसून येत नाही. त्याही पुढे असे जाणवले की स्त्री शिक्षण हे शहरीभागत दिसून येते ग्रामीन भागात स्त्री शिक्षणाचे प्रमाण नगण्य होते. आज घडीला स्त्री मात्र शिक्षणात पुरुषापेक्षाही अग्रेसर असल्याचे दिसून येते. कारण कोणत्याही क्षेत्रातील शिक्षणात महिला पुरुषांच्या बरोबरीने शिक्षण घेत आहेत.

महिला आर्थिक दृष्टया स्वयंपूर्ण होण्यासाठी संघटनेने मांडलेल्या उददेशानुसार हस्तव्यवसायाचे प्रशिक्षण मोठया प्रमाणात अवगत केल्याचे दिसून येते. त्यामुळे काही अंशी महिला आर्थिकदृष्टया सयंमपूर्ण झाल्याचे दिसून आले. उदयोगाच्या वाढत्या प्रगतीने कामगाराची जागा यंत्राने घेण्यास सुरुवात केली. कारण १०० व्यक्तीचे काम एक यंत्र एका तासात पूर्ण करतो. अशा यांत्रिकीकरणातुन सन १९५२ ते १९६९ या काळात कापड उदयोगातील महिला कामगारांची संख्या ४४००० कमी झाली.

अखिल भारतीय महिला परिषद **(A.I.W.C)**समाज सूधारणेच्या क्षेत्रात म्हत्वपूर्ण कार्य केले. बालविवाह, बहुपत्नी, विधवा पुर्नविवाह बंदि, घटस्फोटावरिल बंधणे इत्यादी महिला जीवनाला जखडणाऱ्या कृप्रथा विरुध परिषदेने आवज उठविला. तसेच स्त्रिया व बालके यांच्या अनैतिक किंवा वैश्या व्यवसायात ओढणाऱ्या समस्येवर १९३१ पासून कार्य सुरुकेले. ऐवढेच नाहीतर देवदासी, मुरळी या महिलांचे शोषन करणाऱ्या दृष्ट सामाजीक प्रथे विरुध्द आवाज उठवला.

समाजातील मध्यमवर्गीय स्त्रीया नोकरीच्या क्षेत्रात आल्यामुळे तेथे त्यांच्या विविध समस्यांकडे परिषदेने लक्ष दिले. त्यामध्ये समान वेतन कामाच्या ठिकाणी योग्य वातावरण, कामाचे तास, विश्रांती, भौतीक व संस्कृतिक सुविधांचा अभाव इत्यादी प्रश्नांना हात घालुन त्या विषयी संघर्ष केला. तसेच कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैगिंक शोषणा विरुध्द प्रभावी कायद्याची मागणी केली.

अखिल भारतीय महिला परिषदेने १९५२ मध्ये महिलांना एक नागरिक म्हणून पुरुषांच्या बरोबर मतदानाचा अधिकार देण्यात यावा. अशी महत्वपूर्ण, मागणी केली. त्यामुळे १९३७ च्या प्रांतीक कायदेमंडळाच्या निवडणूकामध्ये महिलांना परिषदेने पाठींबा दिल्याने ५४ महिला निवडून आल्या. दिल्ली येथे Lady lrwin college of Home-Science ची स्थापना केली. त्याप्रमाणे All india save the children committee, Ashok Akbar Moblie Medical Van, Skippo Fund, इ. ची सुरुवात केली. अशा अनेक महिला समस्यांवर महिला संघटनाने आवाज किंवा जनजागृती केल्याने महिला समस्यां मोठया प्रमाणात कमी झालेल्या दिसून येतात. पण काही प्रश्नांबाबतीत समाज आजही महिलांना प्रोत्साहन जेवढे पहिजे तेवढे देताना दिसून येत नाही.

संदर्भः—

१)रानडे, प्रतिभा. १९९२. स्त्री प्रश्नांची चर्चा, एकोणीसावे शतक. मुंबई : पॉप्युलर प्रकाशन.
२)बाबर, सरोजिनी. १९६८. स्त्री शिक्षणाची वाटचाल. महाराष्ट्र राज्य शिक्षण,
३)पाटील, लिला. १९९०. भारतीय स्त्रिजीवन. पुणे : मेहता पब्लीकेशन.
४)शिंदे, ताराबाई. २००४. स्त्री—पुरुष तुलना. पुणे : सुमेध प्रकाशन
५)साळूंखे, आ.ह. २००५. हिंदू संस्कृती आणि स्त्री लोक वाङ्.मय गृह
६)देशमुख, प्रभाकरत्र. १९८७. श्रमाचे अर्थशास्त्र. नागपुर : विद्या प्रकाशन.
७)बोर्डे, सुनिता. २०१०. ऐतिहासीक परिप्रेक्ष्यातील स्त्रिया. पुणे : शुभम पब्लिकेशनस्
८)साने, गिता. १९८६. भारतीय स्त्रिजीवन. मुंबई : खराववाठडी.
९)फुले, सुशीला. २००२. कामगार स्त्री. औरंगाबाद : संवेदन प्रकाशन.

**We the Research Organization will do provide help for the following works listed below.**

*Support for Arts, Commerce & Science all Disciplines*

- **Research Paper Publication**
- **Book Chapters for Publications**
- **ISBN Publications Supports**
- **M.Phil Dissertations Publish**
- **Ph.D. Thesis in Book Format**
- **ISSN Journals with Impact Factor ( 7.675)**
- **Online Book Publication**
- **Seminar Special Issues**
- **Conference Proceedings**

# Aadhar International Publication

For Details Visit To : **www.aadharsocial.com**

Mobile : 9595560278 /



Aadhar Publications

For Details www.aadharsocial.com

New Hanuman Nagar, In Front Of
Pathyapustak Mandal, Behind V.M.V. College, Amravati ( M.S ) India Pin- 444604
, Mob-- 9595560278, Emial: aadharpublication@gmail.com

**Price:Rs.500/**

issn 2278-9308